AHTU
अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष
जालना

दि.16/04/2025

## प्रेस नोट
## अ.मा.वा.प्र.कक्षाची कामगीरी

दिनांक 08/05/2024 रोजी यातील शेवगा ता.अंबड जि. जालना येथे राहणारा फिर्यादी यांची 17 वर्ष वयाची अल्पवयीन मुलगी हिला दिनांक- 06/05/2024 रोजी दुपारी 06.00 च्या सुमारास आरोपी राहुल नंदु बरडे वय-22 वर्ष याने फुस लावुन पळवुन नेले वगैरे फिर्याद वरुन पोलीस ठाणे घनसावंगी येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेला बराच कालावधी होवुन सुद्धा गुन्हयातील आरोपी व पिडीत मुलगी मिळुन न आल्याने सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.पोलीस अधिक्षक सो यांच्या आदेशाने दि.05/02/2025 रोजी अ.मा.वा.प्र.कक्ष जालना यांच्याकडे वर्ग करण्यात आला.

अ.मा.प्र.कक्ष जालना येथील अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी याचे बाबत बारकाईने माहिती काढुन प्रकरणात तांत्रीक विश्लेषन केले असता, नमुद आरोपी हा पिडीत मुलीसोबत छ.संभाजीनगर येथे येत असल्याची गुप्त माहिती मिळाल्याने त्यांचा छ.संभाजीनगर येथे शोध घेत असताना आरोपी व पिडीत सिडको बसस्थानक परीसरात मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पोलीस ठाणे घनसावंगी येथे हजर केले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक श्री.आयुष नोपाणी, पोलीस उपअधिक्षक मनोज राठोड, पोलीस निरीक्षक श्री.पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र.कक्षाचे प्रभारी अधिकारी प्रियंका तुपे, पोउपनि रविंद्र जोशी, संजय गवळी, सागर बावीस्कर (स्थागुशा) महिला अंमलदार पुष्पा खरटमल, संगिता चव्हाण, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक इकबाल शेख यांनी केलेली आहे.

प्रभारी अधिकारी
अ.मा.वा.प्र.कक्ष जालना.